मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या गुरुवार दिनांक २६ ऑगस्ट १९९३ रोजी संपन्न झालेल्या १०व्या बैठकीचा स्थायी करण्यांत आलेला कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

गुरुवार दिनांक २६ ऑगष्ट १९९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १० वी बैठक गुरुवार दिनांक २६ ऑगष्ट १९९३ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. शंकर वामन मटकर | सभापती |
| २. | श्री. हेमराज शाहा | उपसभापती |
| ३. | श्री. पं. दो. वाणी | मुख्य अधिकारी |
| ४. | श्री. यादवराज कांबळे<br>उपसचिव/गृहनिर्माण व<br>विशेष सहाय्य विभाग. | सदस्य |
| ५. | श्री. पोतदार<br>मुख्य अभियंता, मुंबई महानगर,<br>पालिका यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ६. | श्री. रॉकी कास्टो | सदस्य, |
| ७. | श्री. विवेक भर्तू | सदस्य |
| ८. | श्री. महमंद फारख मन्सुरी | सदस्य |
| ९. | श्री. व्ही. बी. वरसकर | सदस्य |
| १०. | श्री. शंकरराव पिटला | सदस्य |
| ११. | श्री. गजेन्द्र लष्करी | सदस्य |
| १२. | श्री. चेतन शाहा | सदस्य |
| १३. | श्री. कमलाकर शर्मा | सदस्य |
| १४. | श्री. महमंद आझम खान | सदस्य |
| १५. | श्री. श्रीकांत पाटील | सदस्य |
| १६. | श्री. प. म. काजरोळकर,<br>उप करनिर्धारक व संकलक<br>मुंबई महानगरपालिका. | निमंत्रित. |

मा. सभापती, डॉ. शंकरराव मटकर, यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. प्रारंभी मा. सभापती व अधिकारी यांचे स्वागत करण्यांत आले. व त्यानंतर बैठकीच्या नियमित कामास सुरवात झाली.

2 222

3

बाब क्रमांक : १०:१

विषय :- दिनांक २८ जुलै १९९३ रोजी झालेल्या मंडळाच्या ९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे..

पृष्ठ क्रमांक १ ते ३९ वर मंडळाच्या ९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सादर केलेला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. सदस्यांना पुढीलप्रमाणे सूचना केल्या.

[१] श्री. हेमराज शाहा :- पृष्ठ क्रमांक ५ वर ५ नवीन कामे व ५ जुनी कामे असा उल्लेख हवा (हवाला). ही सूचना मान्य करण्यात आली.

[२] पृष्ठ क्रमांक ९ वर ११.३३ ऐवजी १.३३ अशी दुरुस्ती सुचविण्यात आली.

वरील सुधारणांसह ९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक : १०:२

विषय :- अनुपालन अहवाल.

पृष्ठ क्रमांक ४१ ते ८५ वर सादर केलेल्या अनुपालन अहवालावर सविस्तर चर्चा झाली. पुनर्रचित इमारतीमधील रिक्त गाळ्यांच्या संदर्भात पृष्ठ क्रमांक ४१ ते ५७ वर तपशिल दिला आहे. या विषयावर सर्वश्री शंकरराव पिट्ला, फारुख मन्सुरी, कमलाकर शर्मा इत्यादी सदस्यांनी चर्चा केली. हे गाळे कधी-पासून रिक्त आहेत याची माहिती पुढील बैठकीत सादर करण्याचे आदेश देण्यात आले. रिक्त गाळ्यांच्या अनधिकृत वापर होत असल्याविषयीची तक्रार सदस्यांनी केली. रिक्त गाळ्यांना योग्य प्रकारे कडी कोयंडा लावल्यास गाळ्यांचा अन-धिकृत वापर होणार नाही अशी सूचना मान्य करण्यात आली. फारुख मन्सुरी यांनी निदर्शनास आणून दिले की, ९५-९७ चिमणा बुचर स्ट्रीट या इमारतीत २ गाळे रिकामे आहेत.

पण त्याचा उल्लेख यादीत नाही. या संदर्भात चौकशी करण्याचे मान्य करण्यांत आले. श्री. चेतन शहा यांनी सूचना केली की, रिकामी असणाऱ्या गाळ्यांच्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेकडे अर्ज केल्यास त्या प्रमाणांत करांमध्ये सूट मिळू शकेल. रिकामी गाळ्यांच्या संदर्भात करांत सूट मिळण्या-साठी मुंबई महानगरपालिकेकडे अर्ज करावा असे ठरले. या यादीप्रमाणे सुमारे ४०० गाळे रिकामी राहिल्यामुळे संक्रमण शिबिरांतील गरजू रहिवाश्यांची गैरसोय होत आहे. शिवाय मंडळाच्या मोठा महसूल बुडीत आहे याबद्दल सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, येत्या तीन महिन्यांत जास्तीत जास्त रिक्त गाळ्यांचे वितरण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

संक्रमण शिबिरांतील रिक्त गाळ्यांच्या तपशिल पृष्ठ क्रमांक ५७ वर सादर केला आहे. सदस्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, संक्रमण शिबिरातील गाळा सोडतांना भाडे-करू विद्युत बिलाची थकबाकी भरीत नाहीत. त्यामुळे नविन भाडेकरूस निष्कारण थकबाकी भरण्याचा भूर्दंड पडतो व ही थकबाकी न भरल्यास विद्युत पुरवठा बंद करण्यांत येतो. या संदर्भात खुलासा करण्यांत आला की, पुनर्रचित इमारतीमधील गाळ्याचा ताबा देण्यापूर्वी संबंधित भाडेकरूने संक्रमण शिबिरा-तील पूर्ण थकबाकी भरली असल्याची खात्री करून घेतली जाते व नंतरच गाळ्याचा ताबा दिला जातो. परंतू इमारत दुरूस्तीच्या संदर्भात किंवा गाळ्यांत घुसखोरी झाली असल्यास अशाप्रकारची खबरदारी घेणे शक्य होत नाही. दुरूस्तीच्या वेळी संक्रमण शिबिरांत गाळा वितरित केला असल्यास अनामत रक्कम घेतली जाते व थकबाकी या अनामत रक्कमेतून वसुल केली जाते. या संदर्भात सदस्यांनी सूचना केली की, विद्युत बिलांच्या थकबाकीची रक्कम अनामत रक्कमेपेक्षा अधिक होत असल्याने अनामत रक्कमेत वाढ करण्यांत यावी. या सूचनेवर विचार करण्याचे मान्य करण्यांत आले. संक्रमण शिबिरे व पुनर्रचित गाळे

यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी एक विशेष बैठक आयोजित करावी असे ठरले. मुख्य अधिकारी यांनी विनंती केली: सदस्यांनी आपल्या सूचना लेखी स्वरुपात सादर केल्यास त्यांचे संकलन करून बैठकीपुढे विचारार्थ ठेवणे शक्य होईल. ---

आहे थकबाकीच्या संदर्भात अद्याप मोठ्या प्रमाणात वसुली व्हावयाची आहे व या संदर्भात कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे याची विचारणा सदस्यांनी केली. या संदर्भात खुलासा करण्यात आला की, थकबाकी वसुलीचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे व त्यानुसार अपेक्षित वसुली होत आहे.

श्री. काजरोळकर, उप करनिर्धारक यांनी उपकराच्या थकबाकीच्या वसुलीची सविस्तर माहिती दिली. २० कोटी रुपये थकबाकी वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले असे त्यांनी सांगितले. श्री. कांबळे, उपसचिव यांनी सूचना केली की, मुंबई महानगरपालिकेने थकबाकीची वसुलीची गती वाढवावी. अद्यापही ४८ कोटी रुपयाची वसुली व्हावयाची आहे. ही वसुली करण्यासाठी कोणते उद्दिष्ट ठरविले आहे याची त्यांनी माहिती विचारली. श्री. काजरोळकर यांनी खुलासा केला की, इमारत दुरुस्ती उपकरातून वगळण्याविषयीची सर्व प्रकरणे असून त्याचा निर्णय लागेपर्यंत या वसुलीच्या संदर्भात निश्चित कार्यक्रम ठरविता येत नाही. श्री. कांबळे यांनी प्रश्न विचारला मुंबई महानगरपालिकेतील अंशदानाची रक्कम कधी देण्यात येणार आहे ? या संदर्भात मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा केला की, मुंबई महानगरपालिकेतर्फे १९९२-९३ या वर्षापर्यंत अंशदानाची पूर्ण रक्कम मंडळास देण्यात आली आहे.

श्री. चेतन शाहा यांनी प्रश्न उपस्थित केला की, पुनर्रचित इमारतीमधील अनिवासी गाळ्यांची तूट भरून काढण्यासाठी पुनर्रचित इमारतीत अतिरिक्त अनिवासी गाळे बांधण्याविषयी कोणती उपाययोजना केली आहे ? या संदर्भात खुलासा केला की, मुंबई महानगरपालिकेकडे चर्चा करण्यापूर्वी पुनर्रचित इमारतीमध्ये तुटीचे अनिवासी गाळे किती आहेत

याची निश्चित माहिती काढण्याची आवश्यकता आहे. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर यासंबंधीचे धोरण निश्चित करण्यासाठी मुंबई महानगरपालिका व अन्य संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येईल.

विवेक भर्डू, गजेन्द्र लष्करी व अन्य सदस्यांनी विनंती केली की, दंगली व बॉम्बस्फोटांत क्षतीग्रस्त झालेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याविषयी शासनाने कोणता निर्णय घेतला याची माहिती देण्यात यावी. या संदर्भात उपसचिव, श्री. कांबळे यांनी खुलासा केला की, बॉम्बस्फोट व दंगलीत क्षतीग्रस्त झालेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याविषयीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून त्यास मंजूरी अपेक्षित आहे. तुर्तास हा खर्च मंडळाने नियमित निधीमधून करावा असे प्रस्तावित केले आहे. सर्व सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, शासनाने अतिरिक्त निधी मंजूर केल्याशिवाय प्रति चौ.फी.ला ७५०/- वर खर्च करता येणार नाही व तोपर्यंत ही कामे अर्धवट अवस्थेत रहातील. मुख्य अधिकारी यांनी सूचना केली की, पुनर्वसन आकस्मिक निधीमधून अतिरिक्त निधी मंजूर करण्याविषयीचा प्रस्ताव शासन स्तरावर करण्यात यावा. सविस्तर चर्चेअंती सभागृहाच्या भावना शासनाला कळवून या कामासाठी अतिरिक्त निधी लवकरांत लवकर मंजूर करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यांत येईल असे उपसचिव श्री. कांबळे यांनी सांगितले.

उपकरप्राप्त इमारतीमधील गाळेधारकांच्या सहकारी संस्थांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने अद्यापपर्यंत निर्णय घेतलेला नाही अशी माहिती उपसचिव श्री. कांबळे यांनी सभागृहाला दिली.

" हेरिटेज" यादीवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात श्री. चेतन शहा यांनी चर्चा उपस्थित केली. सविस्तर चर्चेअंती उपसचिव श्री. कांबळे यांनी असे सूचित केले की, या संदर्भात शासनातर्फे

नगरविकास विभाग, मुंबई महानगरपालिका हेरिटेज कमिटी व दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सदस्यांनी संयुक्त बैठक आयोजित करून हेरिटेज इमारतींच्या पुनर्विकास संदर्भात मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यांत येतील. या बैठकी नगरविकास विभागाचे अधिकारी श्री. वालेकुंद्री यांनी निमंत्रित करावे असेही ठरले.

पृष्ठ क्रमांक ७७ वर मागील बैठकीत दोन नामंजूर केलेल्या प्रस्तावाबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती सादर केली आहे.

[१] ६८-७० वी ऑगस्ट क्रांती मार्ग डी-१ विभाग या इमारतीच्या क्षेत्रफळा च्या तफावतीबाबतच्या चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी दिली.

[२] १५५-१६१ झकेरिया मस्जिद स्ट्रीट, ब विभाग या इमारतीच्या थकीत उपकराचा भरणा १९९२ पर्यंत भरला असल्याबाबत श्री. प्र. म. काजरोळकर, उपकर निर्धारक व संकलक तसेच कार्यकारी अभियंता "ब" विभाग यांनी माहिती बैठकीत दिल्यानंतर प्रस्ताव मंजूर करण्यांत आला सदर प्रस्ताव परिशिष्ट क्र. ड मध्ये अंतर्भूत करण्यांत आले आहेत.

बाब क्रमांक : १०:३:१

विषय :- उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी.

उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्तीचे प्रस्ताव पृष्ठ क्रमांक ८५-अ ते २०५ वर सादर केले आहेत.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली. मुख्य अधिकारी यांनी दुरूस्ती व पुनर्बांधणी उपक्रमासाठी उपलब्ध असलेल्या निधीविषयी सविस्तर माहिती सभागृहात सादर केली. दुरूस्ती

व पुनर्वाधणी उपक्रमासाठी १९९३-९४ या वर्षासाठी सुमारे ३० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध होणार आहे., त्यापैकी सुमारे रुपये २२ कोटी एवढा निधी संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी उपलब्ध केलेला आहे. वास्तुशास्त्रज्ञांची फी व अन्य दावी वगळता निव्वळ दुरुस्ती कामांसाठी संपूर्ण वर्षासाठी सुमारे २०.०० कोटी एवढा निधी उपलब्ध होवू शकेल. एप्रिल १९९३ ते ऑगस्ट १९९३ या ५ महिन्यांत दुरुस्ती कामांवर आतापर्यंत सुमारे १३ कोटी रुपये खर्च झाले असल्यामुळे उर्वरित ७ महिन्यांसाठी सुमारे ७ कोटी एवढाच निधी उपलब्ध होवू शकत असल्याने दुरुस्तीच्या प्रत्येक अंदाजपत्रकांची काटेकोरपणे छाननी करून दुरुस्तीची अत्यावश्यकता असलेल्या अंदाजपत्रकांनाच प्रशासकीय मंजूरी देण्यांत यावी अशी सूचना त्यांनी सभागृहास केली. सदस्यांनी विचारणा केली की, दरमहा रुपये २.०० कोटी वर्षाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देवूनही रुपये १३.०० कोटी एवढा खर्च कसा काय झाला ? या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, गेल्या कांही वर्षातील अंतिम देयके अदा केल्यामुळे तसेच गेल्या वर्षी सुरु केलेल्या दुरुस्ती कामांची बिले अदा केल्यामुळे हा खर्च वाढलेला आहे. व हा पूर्वानुभव लक्षात घेवून दुरुस्ती अत्यावश्यक असलेल्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याची शिफारस केली. सविस्तर चर्चेअंती पुढीलप्रमाणे संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

| अ.क्र. १. | पृष्ठ क्रमांक २. | कामाचे नांव ३. | विभाग ४. |
|---|---|---|---|
| १. | ८७ | ७७-७७ अ व क प्रभाकर बिल्डिंग | इ-२ |
| २. | ८९ | अंबाबाई मिस्त्री निवास | फग/3 |
| ३. | ९१ | ३७- अ. जयेन्द्र भुवन | फग/3 |
| ४. | ९३ | २७ साटला बिल्डिंग कामाठीपुरा | इ-२ |
| ५. | ९५ | ३८३, अ हरिदास माधुरदास चाळ | फग/द |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| ६. | ९९ | वगळ चाळ, मदनपुरा | इ–२ |
| ७. | १०३ | ५६–५८, लक्ष्मी बिल्डिंग, कामाठीपुरा | इ–२ |
| ८. | १०५ | ८८४– अ खटाव मिल चाळ | इ–२ |
| ९. | १०९ | ४९ गंगाराम बिल्डिंग, कामाठीपुरा | इ–२ |
| १०. | १३१ | २३१ डी, बोटी चाळ | फग/द |
| ११. | १३५ | ३५, दुसरी कारपेंटर स्ट्रीट | सी १/२ |
| १२. | १३९ | कोहिनुर चाळ नं. ४ | फग/द |
| १३. | १५९ | कमल निवास, सेंट पॉल स्ट्रीट | फग/द |
| १४. | १६३ | ७५–अ पानवाला बिल्डिंग | फग/द |
| १५. | १६७ | कोहिनुर मिल चाळ नं. १ | फग/द |
| १६. | १७१ | ९३–१०६ डॉ. बी. ए. रोड | इ–१ |
| १७. | १७५ | १३८, एल. सी. पी. टँक रोड | सी १/२ |
| १८. | १८३ | २२ अ, वाळकेश्वर | डी–१ |
| १९. | १९५ | ४, जंजीका स्ट्रीट | ब |
| २० | १२५ | ३९८ अ. बी. काळबादेवी रोड | सी ३-४ |
| २१ | १२८ | ४ दादी सेठ अग्यारी लेन | डी-१ |

पुढील अंदाजपत्रकांना उपकराची थकबाकी वसूल करण्याच्या अटींवर प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

| अ. क्र. | पृ. क्र. | कामाचे नांव | विभाग |
|---|---|---|---|
| १. | ९७ | ५१ ताविकर निवास, गोखले रोड | फग/उत्तर |
| २. | १३३ | ४८ अकोलावाला बिल्डिंग | इ–१ |
| ३. | १३७ | ३०१ राजा राममोहन रॉय मार्ग | डी–१ |
| ४. | १४३ | ६३ ए. बी. सी. डी. स्लेटर रोड | डी–२ |
| ५. | १४९ | ८–१४, अंबालाल दोशी मार्ग | अ |
| ६. | १५५ | ३१, डंकन कॉजवे रोड | फग/उत्तर |

पुढील दुरुस्ती कामांच्या खर्चात मुख्य अभियंता/प्राधिकरण यांच्या छाननीनंतर प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

| अ. क्र. | पृ. क्र. | कामाचे नाव | विभाग |
|---|---|---|---|
| १. | १७९ | ६–१० प्रेम निवास भाई जिवनजी लेन | सी ३–४ |
| २. | १९९ | ३०–३४ चुनाम किलन रोड | ब |
| ३. | ११३ | ४५–४५ बी, नारायण निवास | सी ३–४ |

पृष्ठ क्रमांक १११ वरील प्रस्ताव उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी तपासून पुन्हा सादर करण्याचे ठरले. [पृष्ठ क्रमांक २०३ वरील प्रस्तावाच्या इमारतीची पहाणी सभापती व उपसभापतींनी करावी असे ठरले.

ठराव क्रमांक : १०:७१

सविस्तर चर्चेअंती 30 ~~२९~~ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास पुढीलप्रमाणे प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

[१] परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या 29 ~~१९~~ इमारतींच्या दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

[२] परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविलेल्या ६ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास दुरुस्ती उपकराची थकबाकी वसुल करण्याच्या अटींवर प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

[३] परिशिष्ट "क" मध्ये दर्शविलेल्या ३ इमारतींच्या अंदाजपत्रकांची छाननी मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी केल्यानंतर प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय झाला.

बाब क्रमांक : १०:३:२

विषय :- प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक खर्चाच्या दुरुस्ती कामास सुधारित प्रशासकीय मंजूरी मिळण्याविषयी.

याविषयीसंबधीचा प्रस्ताव पृष्ठ क्रमांक २०७ ते २११ वर सादर केला आहे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली.

इमारत क्रमांक ३८२ डॉ. भडकमकर मार्ग, या इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी रुपये २,२६,७६४/- एवढया रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती. या कामाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ५,६२,०२४/- एवढा झालेला आहे. प्रशासकीय मंजूरीपेक्षा रुपये ३५,२६०/- एवढा अधिक खर्च झालेला आहे. या अतिरिक्त खर्चास मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्रमांक :-१०:७२

इमारत क्रमांक ३८९, डॉ. भडकमकर मार्ग, या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या प्रशासकीय मंजूरीपेक्षा अतिरिक्त झालेल्या रुपये ३५,२६०/- या खर्चास मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : १०:४

विषय :- व्हिक्टोरिया मिल चाळ या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या इमारत क्र. ७६, हरिश्चंद्र गोरेगांवकर रस्ता "डी" विभाग येथील भूखंड व त्यावरील इमारत नियोजित समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याचा प्रस्ताव.

वरील विषयाचा प्रस्ताव पृष्ठ क्र. २१३ ते २२१ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली.

श्री. चेतन शाहा यांनी मुद्दा उपस्थित केला की, एकंदर १५,८९३.१० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर या प्रस्तावातील एकच इमारत उपकरपात्र आहे व अन्य इमारती दुरुस्ती उपकर रहित असून त्या जागेवर घरमालकातर्फे पुनर्विकासाचे काम सुरु आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे भूखंडाचे विभाजन करणे शक्य होईल काय याचा विचार होणे आवश्यक आहे. सविस्तर चर्चेअंती या मुद्याचा साकल्याने विचार विनिमय करून प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा, असे ठरले. यासाठी श्री. चेतन शाहा यांनी त्यांचे या बाबतचे विश्लेषण व अभिप्राय लवकरच मुख्य अधिकारी यांना द्यावे.

बाब क्रमांक : १०:५:१

विषय :- भूकर पहाणी क्रमांक ४/८३०, लोअर परळ विभाग इमारत क्र. १७ डी ते एच. ना.म.जोशी, हाजी कासम चाळ येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत" प्रमाणपत्र प्रदान करण्याविषयी.

वरील प्रस्ताव पृष्ठ क्र. २२३ ते २२६ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती पुनर्विकासासाठी " ना हरकत " प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय देण्यात आला.

ठराव क्रमांक : १०:७३:

भूकर पहाणी क्रमांक ४/८३० लोअर परळ विभाग इमारत क्रमांक १७ डी ते एच. हाजी कासम चाळ, ना. म. जोशी मार्ग येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत " प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : १०:५:२

विषय :- अंतिम भूखंड क्रमांक ११६ नगर रचना योजना क्रमांक-४ माहिम विभाग इमारत क्रमांक १६ गणेश पेठ लेन, दादर येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत" प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

वरील प्रस्ताव पृष्ठ क्रमांक २२७ ते २३१ वर सादर केली आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

ठराव क्रमांक : १०:७४

अंतिम भूखंड क्रमांक ११६ नगर रचना योजना क्रमांक-४ माहिम विभाग, इमारत क्रमांक १६ गणेश पेठ लेन, दादर येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : १०:५:३

विषय :- भूकर पहाणी क्रमांक ९०, माझगांव विभाग इमारत क्र. ३५, बेलवेदर हिल रोड, माझगांव, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत" प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

वरील प्रस्ताव पृ.क्र. २३३ ते २३९ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती सदर मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत"प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्रमांक : १०:७५

भूकर पहाणी क्रमांक ९०,माझगांव विभाग इमारत क्रमांक ३५ बेलवेदर हिल रोड, माझगांव, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत " प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : १०:५:४

विषय :- भूकर पहाणी क्रमांक ६०, दादर नायगांव विभाग,इमारत क्र. १४० ए.बी.सी.डी.१४७- सी,दादासाहेब फाळके मार्ग,दादर(पूर्व) मुंबई- १४ येथील संकेश्वर भुवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत " प्रमाणपत्र प्रदान करण्याविषयी.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्रमांक २४१ ते २५१ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत" प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

२५

बाब क्रमांक : १०:७६

भूकर पहाणी क्रमांक ६०, दादर, नायगांव विभाग, इमारत क्रमांक १४० ए.बी.सी.डी.१४७ सी, दादासाहेब फाळके रोड [मार्ग] दादर [पूर्व] मुंबई- १४ येथील संकेश्वर भुवन, म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : १०:५:५

विषय :- भूकर पहाणी क्रमांक-२१, मलबार हिल विभाग, इमारत क्रमांक ५३ बाणगंगा रोड, वाळकेश्वर, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र"प्रदान करण्याविषयी.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्रमांक २५३ ते २६१ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. श्री. चेतन शहा यांनी निदर्शनास आणून दिले की, ह्या इमारतीचा "हेरिटेज" यादीत समावेश झालेला आहे. या पुनर्विकासाच्या प्रस्तावाच्या संदर्भात "हेरिटेज" कमिटीकडून "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त केल्याचा उल्लेख केलेला नाही. सविस्तर चर्चेअंती श्री. चेतन शहा यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा विचार करून प्रस्ताव प्रलंबित ठेवावा असे ठरले.

बाब क्रमांक : १०:५:६

विषय :- अंतिम भूखंड क्रमांक ८३०, नगर रचना योजना क्रमांक-४ माहिम चर्च रोड [एस.के.बोले रोड] येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याविषयी.

...मतीने घेण्यात आली.

ठराव क्रमांक : १० : ७६

भूकर पहाणी क्रमांक ६०, दादर, नायगांव विभाग, इमारत क्रमांक १४० ए बी सी डी १४७ सी, [दादासाहेब फाळके रोड [मार्ग] दादर [पूर्व], मुंबई- १४ येथील सकेश्वर भुवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : १० : ५ : ५

विषय :- भूकर पहाणी क्रमांक २१, मलबार हिल विभाग, इमारत क्रमांक ५३, बाणगंगा रोड, वाळकेश्वर, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याविषयी.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्रमांक २५३ ते २६१ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. श्री. चेतन शहा यांनी निदर्शनास आणून दिले की, ह्या इमारतीचा "हेरिटेज" यादीत समावेश झालेला आहे. या पुनर्विकासाच्या प्रस्तावाच्या संदर्भात "हेरिटेज" कमिटीकडून "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त केल्याचा उल्लेख केलेला नाही. सविस्तर चर्चेअंती श्री. चेतन शहा यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा विचार करून प्रस्ताव प्रलंबित ठेवावा असे ठरले.

बाब क्रमांक : १० : ५ : ६

विषय :- अंतिम भूखंड क्रमांक ८३०, नगर रचना योजना क्रमांक ४ माहिम चर्च रोड [एस. के. बोले रोड] येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याविषयी.

य एकमताने घेण्यात

वरील प्रस्ताव पृष्ठ क्रमांक २६३ ते २७१ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती या प्रस्तावातील मालमत्तेच्या पुनर्विकास करण्यासाठी " ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्रमांक : १०:७८

अंतिम भूखंड क्रमांक ८३०, नगर रचना योजना क्र. ४ माहिम विभाग, इमारत क्रमांक-१५२ अ, पोर्तुगीज चर्च रोड, [ एस. के. बोले रोड ] येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक : १०:५:७

विषय :– अंतिम भूखंड क्रमांक १२७, नगर रचना योजना क्रमांक–४ माहिम विभाग इमारत क्रमांक–११, आर. के. वैद्य मार्ग, दादर मुंबई येथील विश्वास या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याबाबत.

वरील प्रस्ताव पृष्ठ क्रमांक २७३ ते २७९ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती प्रस्तावातील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्रमांक : १०:७९

अंतिम भूखंड क्रमांक १२७ नगर रचना योजना क्र. ४ माहिम विभाग इमारत क्रमांक –११ आर. के. वैद्य मार्ग, येथील "विश्वास" या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी" ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

२e

बाब क्रमांक : १०:६

विषय :- १२२-१३०, ११४ डी व ई तोबावाणी चाळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ई विभाग या इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळण्याविषयी.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्रमांक २८१ ते २११ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. कार्यकारी अभियंता पु. वि. २ यांनी योजनेची सविस्तर माहिती दिली. या इमारतीमधील रहिवाश्यांचे वाद मिटण्याच्या कामी मा. सभापतींनी प्रयत्न केल्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. न्यायालयीन प्रकरणांमुळे या योजनेच्या कार्यवाहीस फार विलंब झाला असल्यामुळे ही योजना विनाविलंब कार्यान्वित करावी अशी सूचना मा. सभापतींनी केली. सविस्तर चर्चेअंती या पुनर्बांधणी योजनेच्या रूपये १,६०,६६,४०१/- एवढया अंदाजित खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्रमांक : १०:८०

१२२-१३०, ११४ डी व ११४ ई तोबावाणी चाळ, ई विभाग या इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेच्या रूपये १,६०,६६,४०१/- [रूपये एक कोटी साठ लक्ष सहासष्ठ हजार चारशे एक फक्त ] एवढया अंदाजित खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

✓ बाब क्रमांक : १०:७

विषय :- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय.

[१] दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे लेखापाल श्री. श्रीनिवास गुरुराव बेटगिरी यांनी व्यक्तीशः प्रयत्न करून पुनर्रचित

इमारतींच्या करपात्र मुल्यात कपात करून रुपये ६,११,०८१/- एवढा कर वाचवून मंडळाचा अधिक फायदा केल्याबद्दल श्री. बेटगिरी यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव बैठकीपुढे सादर करण्यात आला. या कामगिरीबद्दल सर्व सदस्यांनी श्री. बेटगिरी यांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढीलप्रमाणे ठराव संमत केला.

ठराव क्रमांक : १०:८१

श्री. श्रीनिवास गुरुराव बेटगिरी, लेखापाल यांनी वैयक्तिक प्रयत्न करून पुनर्रचित इमारतींच्या करपात्र मुल्यात कपात केल्यामुळे मंडळास रुपये ६,११,०८१/- एवढा अधिक लाभ झालेला आहे. श्री. बेटगिरी यांच्या योगदानाबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन करण्यात येत आहे.

[२] मंडळाची ११ वी बैठक सोमवार दिनांक २७ सप्टेंबर १९९३ रोजी आयोजित करण्याचे एकमताने ठरले.

माननीद सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी व निमंत्रित यांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यात आले.

सभापती,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्र. मंडळ,
मुंबई.

d notice that t
d by me as pe
spective doc
asis and do

33

## परिशिष्ट क्रमांक - "अ"

दिनांक २६.८.१९९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १० व्या बैठकीत मंजूरी दिलेल्या दुरुस्तीच्या प्रस्तावांची यादी.

| क्रमांक | पृष्ठ क्रमांक | इमारतीचे नांव | विभाग. |
|---|---|---|---|
| १] | ८७ | प्रभाकर बिल्डिंग, ७७-७७ अवक | इ-२ |
| २] | ८९ | अंबादुर्गा मिस्त्री निवास २०६ सेनापती बापट मार्ग. | फ/उ |
| ३] | ९१ | ३७ अ- जयेन्द्र भुवन, एस.के.बोले मार्ग. | फ/उ |
| ४] | ९३ | २७,साटला बिल्डिंग कामाठीपुरा ६ वी गल्ली | इ-२ |
| ५] | ९५ | ३८३ अ. हरिदास मथुरादास चाळ गणेश गल्ली. | फ/द |
| ६] | ९९ | १९-२१ दगडचाळ, मौलाना आझाद रोड मदनपुरा. | इ-२ |
| ७] | १०३ | ५६-५८ लक्ष्मी बिल्डिंग,कामाठीपुरा २ री गल्ली. | इ-२ |
| ८] | १०५ | ८८४ अ. खटाव मिल चाळ नं. ३ व ४ बापूराव जगताप मार्ग. | इ-२ |
| ९] | १०९ | ९ गंगाराम बिल्डिंग, कामाठीपुरा सातवी गल्ली. | इ-२ |
| १०] | १३१ | ३३१,डी,बोरी चाळ, ना.म.जोशी मार्ग, | फ/द, |
| ११] | १३५ | ३५ दुसरी कारपेंटर स्ट्रीट | सी १/२ |
| १२] | १३९ | कोहीनूर चाळ क्रमांक ४ ज्योतिबा फुले मार्ग | फ/द |
| १३] | १५९ | १४१ कमल निवास, सेंट पॉल स्ट्रीट | फ/द |
| १४] | १६३ | ७५ अ पानवाला बिल्डिंग नं. २ डॉ. एस.एस. राव मार्ग. | फ/द |
| १५] | १६७ | कोहीनूर चाळ क्र. १ ज्योतिबा फुले मार्ग | फ/द |
| १६] | १७१ | ९२-१०६ डॉ. बी. अ. रोड | इ-१ |
| १७] | १७५ | १३८ एल, सी.पी.टँक रोड | सी १/२ |
| १८] | १८३ | २२ अ वाळकेश्वर रोड. | डी-१ |
| १९] | १९५ | ४ जंजीकर स्ट्रीट | ब. |

## परिशिष्ट क्रमांक

notice that
d by me as
spective do
asis and d

उपकर वसुली करण्याच्या अटीवर मंजूर ... लेले प्रस्ताव.

| अ. क्र. | पृष्ठ क्रमांक | इमारतीचे नांव | वि. |
|---|---|---|---|
| १. | ९७ | ५१ ताविकर निवास, गोखले रोड | फग |
| २. | १३३ | ४८ अकोला बिल्डिंग, डॉ. बा. आ. मार्ग | इ–१ |
| ३. | १३७ | ३०१ राजाराम मोहन रॉय रोड | डी–१ |
| ४. | १४३ | स्टेशन टेरेस ६३, अ. सी. सी. डी. स्लेटर रोड | डी–२ |
| ५. | १४९ | ८–१४ अंबालाल दोशी मार्ग | अ |
| ६. | १५५ | ३१ किशोर कुंज, डंकन कॉजवे रोड | फ/उ |

## परिशिष्ट क्रमांक – "क"

प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या खर्चास मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी छाननी केल्यानंतर प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यांत आला.

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| १. | १७९ | ६–१० प्रेमनिवास भाई जीवनजी लेन | सी ३/४ |
| २. | १९९ | ३०–३४ चुनाम किल्न लेन | ब |
| ३. | ११३ | ४५–४५ बी नारायण निवास केवल क्रॉस लेन नं. ३./ ३७–४१ दादीशेठ अग्यारी लेन | सी ३/४ |

## परिशिष्ट क्रमांक – "ड"

कार्यवाही तक्त्याअंतर्गत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेवून मंजूर केलेल्या प्रस्तावांची यादी.

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| १. | ७७ | ६८–७० बी ऑगष्ट क्रांती मार्ग, जेरमॅन्शन | डी–१ |
| २. | ७७ | १५५–१६१ झकेरिया मस्जिद स्ट्रीट | ब |

पृष्ठ क्र. ३ वर सुधारणा – हवा ह्या शब्दाऐवजी होता.

पृष्ठ क्र. १५ वर सुधारणा – क्र. २० ३९८ काळबादेवी रोड सी–२ } खर्चास प्रशासकीय
क्र. २१ ? दादीसेठ अग्यारी लेन डी–१ } मंजूरी

पृ. क्र. १७ वर सुधारणा २८ इमारतीऐवजी ३० व परिशिष्ट अ मध्ये १९ ऐवजी २१.

वरील सुधारणेसह, कार्यवृत्तांत स्थायी करणेत आला.

सचिव
मुंबई इमारत दु. व पु. मंडळ

सभापती
मुंबई इमारत दु. व पु. मंडळ.